## संक्षिप्त वृत्त

### वाहनाच्या धडकेत युवकाचा मृत्यू ; वाहनचालकाविरोधात गुन्हा दाखल

**सोलापूर :** दारूच्या नशेत रस्त्यावरून जाणाऱ्या युवकाला वाहनाची जोरदार धडक बसली. या अपघातात गुरुनाथ सुभाष श्रीगण (वय- ४७, वजेश्वर नगर अक्कलकोट नाका, सोलापूर) यांचा मृत्यू झाला. ही घटना दि.२२/०७/२०२५ रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास, महालक्ष्मी मंदिर सिग्नलजवळ अक्कलकोट रोड, सोलापूर येथे घडली आहे. या प्रकरणी मायताचे भाऊ श्रीनाथ सुभाष श्रीगण (वय ३२, रा. ३२, वजेश्वर नगर, अक्कलकोट नाका, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात वाहन चालकविरोधात जेलरोड पोलीस ठाण्यात भा. न्याय संहिता क १०६,२८१, मोवाकाक १८४,१३४(अ), (ब) प्रमाणे (दि.२९) ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी मस्के करत आहेत.

### अक्कलकोट रोडवर बसची दुचाकीला धडक; भाचा मावशी जखमी

**सोलापूर :** अक्कलकोट रोडवरील मल्लिकार्जुन नगर येथे दुचाकीला बसची पाठीमागून धडक बसल्याने याधडकेत मावशीसह भाचा गंभीर जखमी झाले आहेत. ही घटना (दि.२५) ऑगस्ट रोजी रात्री ११:०० वाजण्याच्या सुमारास घडली आहे. धनराज चव्हाण आणि त्याची मावशी ज्योती काळे हे दोघेही रात्रीच्या सुमारास एम एच १३ ई डी ८७३७ या क्रमांकाच्या मोटरसायकलवर अक्कलकोट रोड वरून सोलापूरच्या दिशेने येत होते. येथे उड्डाणपुलाचे काम सुरू असताना वाहन क्रं. एम एच १३ ए एक्स ०५७७ स्कुल बसच्या चालकाने रिव्हर्स घेताना पाठीमागे न पाहता निष्काजीपणाने वाहन चालवत दुचाकीला धडक देऊन भाचा आणि मावशी यांना गंभीर जखमी केले आहे. या प्रकरणी धनराज शिवाजी चव्हाण, ( वय २२, रा. हणमगाव, पारधी वस्ती, ता. द. सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून एम एच १३ ए एक्स ०५७७ स्कुल बसचा चालकाविरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात भा. न्याय संहिता क २८१,१२५ (अ), (ब), मोवाकाक १३४(ब),१८४/१७७प्रमाणे दि.२९ ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे पुढील तपास पोलीस कर्मचारी मुजावर करत आहेत.

### कामगाराच्या पगारासाठी एक लाखांची मागणी करत विवाहितेचा छळ

**सोलापूर :** तुम्हाला मुलगी नांदविण्यासाठी पाठवायचे असेल, तर एक लाख रु सोबत पाठवा अशी मागणी करत विवाहितेचा छळ केला तसेच तिचा पतीने दारु पिवून शिवीगाळ, मारहाण करुन माहेरी हाकलून दिले. ही घटना दि. २०/०५/२०२४ ते दि. ०६/०९/२०२५ या कालावधीत विवाहितेच्या सासरी सासरी २ नंबर झोपडपट्टी गंगामाई हॉस्पीटल मागे सोलापूर येथे घडली आहे. याप्रकरणी पिंकी मारेप्पा माशाळकर ( वय २६, रा. १४३/१४४, रेल्वे लाईन, कोनापुरे चाळ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून संशयित आरोपी पती मारेप्पा,सासरे राजू यांच्या विरोधात भा. न्याय संहिता क ८५,११५(२), ३५२,३ (५) प्रमाणे (दी.२९) ऑगस्ट रोजी सदर बझार पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी मोरे करत आहेत.

### हॅंडल लॉक तोडून मोटरसायकल चोरीला

**सोलापूर :** सोलापूर शहरातील सात रस्ता नाना नानी पार्क समोरून (दि. २९) ऑगस्ट रोजी रात्री आठ वाजण्याच्या सुमारास एमएच १३ ए के ०३७३ या क्रमांकाची सुमारे ७,५०० रुपये किमतीची हॅण्डल लॉक करून ठेवलेली काळ्या रंगाची त्यावर निळा पट्टा असलेली हिरोहोंडा स्प्लेंडर मोटरसायकल चोरीला गेल्याची घटना घडली आहे. याप्रकरणी पुरुषोत्तम गुरुनाथ कारकल (वय ३७, रा. ९ स्वामी समर्थ सोसायटी, जुळे सोलापूर सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून अज्ञात चोरट्याच्या विरोधात भा. न्या. सहिता कलम ३०३ (२) प्रमाणे सदर बझार पोलीस ठाण्यात ( दि.२९) ऑगस्ट रोजी गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी मुलाणी करत आहेत.

## कोर्टातील केस मागे घेण्याच्यावरून मामाचा भाच्यावर कोयत्याने हल्ला

**सोलापूर :** सोलापूर शहरात मामाने आपल्या भाच्यावर कोयत्याने मारहाण केल्याची घटना घडली आहे. संशयित आरोपी मामा सोहेल शेख याने बहिणीचा मुलगा रेहान सय्यद यास मोबाईलवर कॉल करुन तु माझ्या विरोधात दाखल केलेली केस कोर्टातुन माघारी घे असे म्हणत मामा सोहेल शेख याने आपल्या भाच्याला दमदाटी केली. या घटनेची माहिती मिळताच फिर्यादी सर्फराज काजी याचा भाऊ वसीम आणि त्याचा मित्र मुक्या हे दोघे विडी घरकुल येथे जाब विचारण्यासाठी गेले असता संशयित आरोपी सोहेल शेख याने त्या दोघांना देखील मोटारसायकल आडवुन वसीम याला लोखंडी कोयत्याने पाठीवर व हातावर जबर वार करून जखमी केले. तसंच आरोपीच्या इतर मित्रांनी देखील फिर्यादीच्या भावास लाकडी दांडक्याने पायावर मारहाण केली.

मुदस्सर बागलकोटे यास तिसऱ्या मित्राने कोयत्याने त्याच्या डाव्या बगलेमध्ये मारुन जखमी केले. त्यावेळी फिर्यादी सोडवासोडवी करत असताना सोहेल शेख व त्याच्या मित्रांनी हातातील कोयत्याने फिर्यादी सरफराज काझी यांच्या हाताच्या अंगठ्यावर जोरदार हल्ला केला. ही घटना (दि.२८) ऑगस्ट रोजी ७.३० वाजण्याच्या सुमारास, धनलक्ष्मी नगर, सोलापूर येथे घडली आहे. या प्रकरणी सर्फराज अब्दुल करीम काजी (वय ३५, रा. ४६८, पाथरुट चौक, पाच्छा पेठ, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून सोहेल शेख ( रा. धनलक्ष्मी नगर, विडी घरकुल, सोलापूर) आणि त्याचे ईतर तीन अज्ञात मित्र यांच्यावर एमआयडीसी पोलीस ठाण्यात भा. न्याय संहिता क ११८(१), १२६(१) ११५(२), ३५२,३५१ (२), भारतीय हत्यार कायदा कलम ४/२५ प्रमाणे (दि.२९) ऑगस्ट रोजी दुपारच्या सुमारास गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी दत्ता नवले करत आहेत. दरम्यान, त्याच घटनेत प्रति तक्रार नोंदवण्यात आली आहे. तु रेहानला पोलीस केस मागे कशाला घे म्हणतोस असे म्हणत घरासमोर येवून वसीम काझी याने फिर्यादी साहिल शेख यांना गालावर चापट मारत शिवीगाळ केली. तसेच ईतर संशयित आरोपीनी तीन मोटार सायकलीवर परत येवून फिर्यादी सोहेल यांच्या आई, आजी व भाऊ या सर्वांना शिवीगाळ केली. वसीम काझी याने त्याचे हातातील लाकडाने फिर्यादी सोहेल शेख यांच्या डाव्या गालावर व हातावर मारहाण केली. यावेळी त्याच्या इतर मित्रांनी देखील फिर्यादीस हाताने व लाथाबुकयांनी मारुन जखमी केले आहे. ही घटना( दि.२८) ऑगस्ट रोजी ७.३० वाजण्याच्या सुमारास, धनलक्ष्मी चौक, सोलापूर येथे घडली आहे. या प्रकरणी साहिल सैपन शेख (वय २७, रा. धनलक्ष्मी नगर, विडी घरकुल, सोलापूर) यांच्या फिर्यादीवरून वसीम काजी व इतर पाच व्यक्तीच्या विरोधात एमआयडीसी पोलीस ठाण्यात भा. न्याय संहिता क ११८ (१), १८९(१), १८९(२),१८९ (४),१९०,३५२ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलिस कर्मचारी दत्ता नवले करत आहेत.

● टास्क फोर्स ॲक्शनमोडमध्ये येण्याला काही क्षण होते बाकी ● मराठा मावळ्यांनी शांततेत घेतलं अन् पुढचा मार्ग निघाला

# आक्रमक आंदोलक मराठे अन् दंगल नियंत्रण पथके आमन-सामने; जरागे-पाटलांचा निरोप आला, मावळे हटले, मोठा अनर्थ टळला!

- शौचालयांसह पाणीपुरवठ्याची मोठी गैरसोय
- मराठा आंदोलकांचा सरकारसह महापालिकेवर संताप
- आंदोलन सिग्नल अन् बेस्ट बसवर चढले
- तुफानी गर्दीने परिसरातील रस्ते जॅम,
- 'सीएसएमटी'बाहेरचा रस्ता रोखून धरला
- दंगल नियंत्रण पथकांनी हटवली गर्दी



मुंबई : दंगल नियंत्रण पथकाचे जवान आणि आंदोलक असे आले आमने-सामने.


मुंबई/प्रतिनिधी

ओबीसीमधून आरक्षण मिळण्याच्या मागणीसाठी राज्यभरामधील लाखो मराठा आंदोलकांचे आंदोलन मुंबईत सुरु आहे. दरम्यान शौचालयासह पाणीपुरवठा या सुविधा पुरविण्यात न आल्याने आंदोलकांची शनिवारी (ता.३०) प्रचंड गैरसोय झाली. त्यातून आंदोलकांनी सरकार आणि मुंबई महापालिकेविरुद्ध निषेध व्यक्त करत 'सीएसएमटी'बाहेरचा रस्ता रोखून धरला. त्यातून येथे प्रचंड वाहतुकीची कोंडी झाली. काही आंदोलक सिग्नल अन् बेस्ट बसवर चढले. आंदोलकांना हटवण्याचा पोलिसांनी प्रयत्न केला मात्र ते काहीही ऐकून घेण्याच्या मनस्थितीत नव्हते. या दरम्यान दंगली नियंत्रण पथक, स्पेशन टास्क फोर्स आदी यंत्रणा येथे सज्ज झाल्या. टास्क फोर्स ॲक्शनमोडमध्ये येण्याला काही क्षण होते बाकी. याप्रसंगी मराठा चळवळींचे नेते मनोज जरांगे-पाटील यांचा रस्ता रिकामा करण्यासंबंधी निरोप आला. त्यांचे काही खास समर्थक आंदोलकांना हटवायला आले. आक्रमक आंदोलक मराठे अन् दंगल नियंत्रण पथक आमन-सामने आले होते. यावेळी होणारा मोठा अनर्थ टळला. जरांगे-पाटलांच्या निरोपावर आंदोलकांनी रस्ता मोकळा केला.

संतापलेल्या मराठा आंदोलकांनी शनिवारी सकाळपासून छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस स्थानकाबाहेरचा रस्ता रोखून धरला होता. मराठा आंदोलकांनी रस्त्यावर उतरत जवळपास चार तास येथील वाहतूक रोखून धरली. मनोज जरांगे यांच्या जवळच्या सहकाऱ्यांनी रस्त्यावरुन बाजूला हटण्याचे आवाहन करुनही मराठा आंदोलक ऐकायला तयार नव्हते. यापैकी काही आंदोलकांनी सिग्नल आणि बेस्ट बसवर चढत हुल्लडबाजी केली. मुंबई पोलिसांनी या आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, त्याचा फायदा झाला नाही. यानंतर मनोज जरांगे पाटील यांच्यासोबतच्या स्वयंसेवकांनीही आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. मात्र, साधे पिण्याचे पाणी आणि शौचालयात जाण्यासाठी पाणी न मिळाल्यामुळे आक्रमक झालेले मराठा आंदोलक ऐकायला तयार नव्हते.

या पार्श्वभूमीवर दंगल नियंत्रण पथकाच्या जवानांकडून या आंदोलकांना रस्त्यावरुन हटवण्यास सुरुवात झाली आहे. मुंबई पोलिसांनी याठिकाणी दंगल नियंत्रण पथकाच्या चार तुकड्या मागवून घेतल्या आहेत. पोलिसांकडून एक रांग बनवण्यात आली असून त्यांच्याकडून जमावाला इथून हटवले जात आहे. त्यांच्या मदतीला पोलीस आणि मराठा समाजाचे स्वयंसेवकही आहेत.

### एका मिनिटांत होतंय... 'जीआर'साठी आता वेळ देणार नाही शनिवार-रविवारपर्यंत उरका अन्यथा महाराष्ट्र इथं येईल : जरांगे-पाटील



**मुंबई :** निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या समितीने उपोषणस्थळी जाऊन मनोज जरांगे पाटलांची भेट घेतली. यावेळी जरांगे पाटील यांनी मोठे विधान केले.मराठा आरक्षणाच्या मागणीवर राज्यभरातील मराठा समाज आक्रमक झाला आहे. मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण मिळावे यासाठी गेल्या दोन दिवसापासून मराठा आंदोलक मनोज जरांगे मुंबईतील आझाद मैदानावर उपोषण करीत आहेत. त्यामुळे राज्यभरातील वातावरण चांगलेच तापले आहे. राज्य सरकारच्या मराठा आरक्षण उपसमितीने कुणबी नोंदी शोधण्यासाठी निवृत्ती न्यायमूर्ती शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिंदे समितीची स्थापना शनिवारी केली आहे. निवृत्त न्यायमूर्ती शिंदे यांच्या समितीने उपोषणस्थळी जाऊन मनोज जरांगे पाटलांची भेट घेतली. यावेळी जरांगे पाटील यांनी मोठे विधान केले.

जरांगे यांच्या भेटीसाठी आलेल्या शिंदे समितीने मागण्यांची अंमलबजावणीसाठी काही वेळ मागितला. मात्र जरांगे पाटलांनी हैदराबाद आणि सातारा संस्थानचे गॅझेटिअर लागू करण्यासाठी एक मिनिटही वेळ देणार नाही, असे विधान केलं आहे. यावेळी मनोज जरांगे पाटील म्हणाले की, 'येत्या शनिवार-रविवारच्या आत काही झाले नाही तर एकही मराठ्याचे लेकरूबाळ घरी राहणार नाही. महाराष्ट्रातील मराठा घरात दिसणार नाही. अजून सहा सात दिवस हातात आहे. आणखी वेळ गेली नाही. तुमचा अहवाल घ्यावा त्यांनी आणि अंमलबजावणी करावी. मराठवाड्यातील मराठा कुणबी आहे, असे जाहीर करा आणि उद्यापासूनच प्रमाणपत्र द्या, अशी मागणी त्यांनी केली आहे.

यावर शिंदे समितीने खूप अभ्यास केला आहे. या दोन गॅझेटनुसार मराठवाड्यातील मराठा हा कुणबीच आहे. यात वादच नाही. सातारा संस्थानचं गॅझेटिअर लागू करा. औंध संस्थांन आणि बॉम्बे गव्हर्नेमेंटच्या गॅझेटला पंधरा वीस दिवस देऊ. पण हैद्राबाद आणि सातारा संस्थानचं गॅझेट लागू करायला एक मिनिटही वेळ देणार नाही. १३ महिने दिले., असेही यावेळी जरांगे पाटील म्हणाले.

### मराठा आंदोलनावर शहा यांची शिंदे अन् तावडेंसोबत चर्चा



अमित शाह आणि एकनाथ शिंदे यांच्या या बैठकीत मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मार्ग काढण्यासाठी वेगवेगळे काय पर्याय आहेत, यावर चर्चा करण्यात आली. सरकार आणि आंदोलक यांच्यातला संवाद आणि पुढचं पावलांवर शाह आणि एकनाथ शिंदे यांच्यात महत्त्वाचं बोलणं झालं असल्याचं दिसून येत आहे. महत्त्वाची बाब म्हणजे अमित शाह यांनी भाजपचे राष्ट्रीय सरचिटणीस विनोद तावडे यांच्यासोबत तातडीने बैठक घेतली. या बैठकीत मराठा आरक्षणासंदर्भात सविस्तर चर्चा करण्यात आली. या बैठकीदरम्यान राज्यातील आंदोलनाची सद्यस्थिती, पोलिसांचा बंदोबस्त आणि आंदोलकांच्या मागण्यावर यावर चर्चा झाली.

### शरद पवारांचं मोठं विधान ..तर आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो



आरक्षणाचे असे प्रश्न सोडवायचे असतील तर शेवटी राष्ट्रीय पातळीवर निर्णय घेतले गेले पाहिजेत. यामध्ये केंद्र सरकारने निर्णय घ्यावा लागेल. ७२ टक्के आरक्षण तामिळनाडूत होऊ शकतं, तर मग वेळप्रसंगी घटनेत दुरुस्ती करून आरक्षणाचा हा तिढा सोडवण्याची गरज आहे. प्रत्येक राज्यात लहान लहान घटक आहेत. शेतकरी वर्ग आहेत. त्यामुळे घटनेत दुरुस्ती करण्याची भूमिका घेतल्यास आरक्षणाचा प्रश्न सुटू शकतो, असं शरद पवार यांनी म्हटलं आहे.

### राज ठाकरे म्हणाले, सगळी उत्तरे एकनाथ शिंदेच देतील...



राज ठाकरे यांनी प्रतिक्रिया देत मराठा आरक्षणावर एकनाथ शिंदे यांना धारेवर धरले आहे. ठाणे येथील मनसे पदाधिकारी मेळाव्यानंतर त्यांनी माध्यमांशी संवाद साधला.ठाकरे म्हणाले की, मला वाटते, या सगळ्या गोष्टींची उत्तरे तुम्हाला एकनाथ शिंदेंच देऊ शकतात. शिंदे जेव्हा येतील तेव्हा त्यांना विचारा. सगळ्या गोष्टी सगळ्यांना माहिती आहे. यावर एकनाथ शिंदेंच उत्तर देऊ शकतात. मुंबईकरांना जर त्रास होत असेल तर त्याचे उत्तर एकनाथ शिंदे देऊ शकतात. ते मागील वेळी नवी मुंबईत जाऊन प्रश्न सोडवून आले होते, मग ते मुंबईत का आले यावर शिंदेंच उत्तर देतील.

### मनोज जरांगेंचे सहकारी मराठा आंदोलकांवर संतापले

मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांना रस्त्यावरुन बाजूला होण्यास सांगितले होते. मात्र, तरीही मराठा आंदोलक ऐकायला तयार नव्हते. मनोज जरांगे यांचे सहकारी याठिकाणी आले होते. त्यांनी मराठा आंदोलकांची समजूत काढण्याचा प्रयत्न केला. आंतरवाली सराटीचे सरपंच ज्यांनी इतके दिवस आपल्याला सहकार्य केले त्यांची गाडीही तुमच्यामुळे येऊ शकत नाही. आपल्या आंदोलकांच्याच अनेक गाड्या अडकल्या आहेत. नाशिकवरुन पिण्याचे पाणी घेऊन एक ट्रक आला आहे. तोदेखील वाहतूक कोंडीत अडकल्याचे मनोज जरांगे यांच्या सहकाऱ्यांनी मराठा आंदोलकांना सांगितले.

### उद्धव ठाकरे यांची मनोज जरांगे यांच्याशी फोनवरून चर्चा



माजी मुख्यमंत्री आणि शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे नेते उद्धव ठाकरे यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांच्याशी फोनवरून चर्चा केली. अंबादास दानवे यांनी जरांगे यांची भेट घेतली. या भेटीत दानवे यांनी उद्धव ठाकरेंना फोन करून त्यांचे जरांगे यांच्याशी बोलणं करून दिलं. यावेळी ठाकरेंनी मराठा बांधवांना सोयीसुविधा पुरवण्याचं आवाहन केलं आहे.

### मुंबई महानगरपालिकेकडून मराठा आंदोलकांसाठी व्यवस्था

मनोज जरांगेंनी केलेले आरोप खोडून काढण्यासाठी आता मुंबई महानगरपालिका प्रशासनाकडून प्रयत्न सुरु झाले आहेत. आझाद मैदान परिसरात प्रसाधनगृहांसोबतच लाईट्सची उभारणी करण्यात आली आहे. यासोबतच, चार मेडिकल टीम, दोन म्बुलन्स देखील आझाद मैदानात पाठवण्यात आल्या आहेत. मैदानात चिखल झालेल्या परिसरात दोन टन खडी टाकण्यात आल्याची माहिती पालिकेने दिली आहे.मराठा आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर मुंबई महापालिकेकडून एकूण ३२१ प्रसाधनगृहांची व्यवस्था करण्यात आली आहे. सोबतच, ११ पाण्याचे टॅंकर, ४५० साफसफाई कर्मचारी, आणि मेडिकल कर्मचारी देखील सज्ज आहेत. सोबतच, आरोग्यविषयक समस्या आंदोलकांना होऊ नये यासाठी दोन धुम्रफवारणीची व्यवस्था करण्यात आल्याचे महापालिका आयुक्त भूषण गगराणी यांनी सांगितले.

## त्याला अद्दल घडव; बॉयफ्रेंडला सांगितलं, सात वर्षांच्या लेकीसमोरच पतीला संपवलं

- बायको आणि तिच्या पंटरला ठोकल्या बेड्या
- अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा काटा काढण्यासाठी पत्नीनेच रचला कट
- कायमचा काटा काढण्यासाठी प्रियकराच्या तिघा मित्रांनी केली मदत



मृत हनुमंत जनवाडे



संशयित आरोपी पूजा

**लातुरात खळबळ**

लातूर: उदगीर शहरातील पारकट्टे गल्लीत राहणाऱ्या एका महिलेने तिच्या अनैतिक संबंधात अडसर ठरणाऱ्या पतीचा प्रियकर आणि त्याच्या अन्य तीन मित्रांच्या मदतीने खून केला. बुधवारी (२७ ऑगस्ट) सायंकाळी लोणी तालुका उदगीर परिसरात ही हत्या झाल्याची घटना घडली. याप्रकरणी मयताची आरोपी पत्नी आणि तिच्या प्रियकराला पोलिसांनी अटक केली आहे. न्यायालयाने या दोघा आरोपींना तीन दिवसांची पोलिस कोठडी सुनावली. फरार असलेल्या तीन आरोपींपैकी दोघांना उदगीर ग्रामीण पोलिसांनी काल सायंकाळी मुरूड येथून अटक केली.

मृत हनुमंत शरणाप्पा जनवाडे यांना पत्नी पूजा हनुमंत जनवाडेच्या चारित्र्याचा संशय आला. पत्नी पूजाने प्रियकर सुनील ऊर्फ पिंटू पाटील (रा. जानापूर, ता. उदगीर) याला पतीला धमकावून अद्दल घडविण्यासाठी सांगितले. प्रियकर पिंटू पाटीलने ही बाब त्याच्या इतर आरोपी मित्रांना सांगितली. आरोपींनी संगणमत करून बुधवारी दुपारी ४ ते ६.३० दरम्यान मयत हनुमंत जनवाडे यांना त्यांची पत्नी पूजा हनुमंत जनवाडे व तिचा प्रियकर पिंटू पाटीलने तीन मित्रांच्या मदतीने जबरदस्तीने ऑटोत घालून लोणी मोड ता. उदगीर जवळील इच्छापूर्ती मंदिराजवळ घेऊन गेले.

त्या ऑटोतून पूजा, तिची लहान मुलगी उतरले. आरोपींनी हनुमंत जनवाडेंच्या डोक्यात, पाटीवर, हातावर, पायावर पिंडरीवर जबर मारहाण करून गंभीर जखमी केले. मयत हनुमंतला तेथेच सोडून सर्व निघून गेले. गंभीर जखमी हणमंतने पत्नी पूजाला फोन करून घटनास्थळी बोलवून घेतलं. पूजाने आपल्या जखमी पतीला घरी आणले. प्रकृती गंभीर झाल्याने त्यांना उपचारासाठी उदगीरच्या शासकिय रुग्णालयात दाखल केले. तिथे त्यांचा मृत्यू झाला.

## रोपळेत नागरिकांच्या जिवाशी खेळणारी तोतया डॉक्टरांची टोळी पोलिसांकडून जेरबंद

- दोन फरार आरोपींचा शोध सुरु
- बोगस डॉक्टरांची टोळी राजस्थान, हरियाणामधील

पंढरपूर/प्रतिनिधी

पंढरपूर वैद्यकीय शिक्षणाचे कोणतेही प्रमाणपत्र नसताना पंढरपूर तालुक्यातील रोपळे गावात राजस्थान आणि हरियाणा मधून आलेल्या तीन तोतया डॉक्टरांनी दवाखाना थाटल्याची गोपनीय माहिती पंढरपूर तालुका पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांना मिळाली होती. त्या माहितीच्या आधारे रोपळे गावात छापा टाकला असता तीन तोतया डॉक्टर रुग्णांची तपासणी करत असताना रंगेहाथ सापडले. गोविंदा देवी राम प्रजापती (वय २७ रा. भरतपूर, राजस्थान) , जहीर खान (वय २२ रा. पलवल, हरियाणा) आणि आसिफ दिन मोहम्मद (रा. भरतपुर, राजस्थान) या तिघांच्या टोळीला पोलिसांनी अटक केली आहे.

अधिक माहिती अशी की, पंढरपूर तालुक्यांमध्ये तोतया डॉक्टरची टोळी सक्रिय असल्याची माहिती तालुका पोलीस ठाण्याला मिळाली होती. ही टोळी रोपळे गावात रुग्णांची फसवणूक करून त्यांच्यावर चुकीचे उपचार करत आहे. हे बोगस डॉक्टर नागरिकांच्या आरोग्याशी खेळत आहेत, त्यातून नागरिकांच्या जिवाला धोका निर्माण झाल्याची माहिती असल्याची माहिती पोलिसांना मिळाली.

दरम्यान पोलिसांनी धाड टाकली असता हे तीन तोतया डॉक्टर रुग्णांची तपासणी करत असल्याचे निदर्शनास आले. त्यांची सखोल तपासणी केली असता त्यांच्याकडे मोठ्या प्रमाणात इंजेक्शन व इंजेक्शनसाठी वापरण्यात येणारे लहान मोठ्या औषधाच्या बाटल्या, टॅबलेट्स व इतर वैद्यकीय साहित्य सापडले. या आरोपींची टोळी राजस्थान आणि हरियाणातील असल्याचे तपासात निष्पन्न झाले. बीड येथे राहणारा सतीश सोळंकी यांच्या मध्यस्थीने या आरोपींनी रोपळे गावातील एका वस्तीवर खोली भाड्याने घेतली होती. पोलिसांनी तीन बोगस डॉक्टरसह पाचजणांवर गुन्हा दाखल केला आहे. तोतया डॉक्टरांना ताब्यात घेतला असून दोन फरार आरोपींचा शोध सुरू आहे.



रोपळे : राजस्थान आणि हरियानामधील बोगस डॉक्टरांची टोळीला जेरबंद करणारे पोलीस पथक संशयित आरोपींच्या टोळीसह.

या आरोपींवर मेडिकल प्रॅक्टिशनर ॲक्ट १९५६ कलम १५/२ , महाराष्ट्र मेडिकल प्रॅक्टिशनर ॲक्ट १९६१ कलम ३३ तसेच बीएनएस कलम ३१८/४, ३१९/२/३/५ प्रमाणे गुन्हा दाखल केली असल्याची माहिती पोलीस निरीक्षक टी. वाय. मुजावर यांनी दिली.